# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २३/०४/२०१८

### नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे २९ वे रस्ता सुरक्षा अभियान सन - २०१८ चे उद्‌घाटन

---

केंद्र शासनाच्या रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन परिवहन विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार येणा-या पंधरवाडयात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान आयोजित करणेबाबत घोषित केले आहे. त्यानुसार नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली **ग्रामीण पोलीस दलातर्फे २९ व्या रस्ता सुरक्षा अभियानाचे आज रोजी उद्‌घाटन** करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी मा.पोलीस अधीक्षकांच्या हस्ते वाहतुक नियंत्रण मार्गदर्शिका व वाहतुक नियम पत्रकांचे अनावरण करण्यात आले. राज्यातील नैसर्गिक मृत्युनंतर सर्वाधिक मृत्यू हे रस्ते अपघातात होत असतात, आणि या अपघातांमध्ये दरवर्षी जवळपास १२ हजार प्रवाशांचा मृत्यू होत असतो. त्यामुळे रस्त्यावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहेत्र ही बाबत लक्षात घेवुन ग्रामीण पोलीस दलातर्फे रस्ता सुरक्षा अभियानाची सुरूवात करण्यात आली आहे. समाजप्रबोधनाच्या माध्यमातुन रस्ता सुरक्षेचे महत्व लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य या अभियानाव्दारे केले जाणार आहे. **नाशिक ग्रामीण जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखेतर्फे** येत्या पंधवाडयात (दि.२३ एप्रिल २०१८ ते ०७ मे २०१८ या कालावधीत) **जिल्हयातील ४० पोलीस ठाणे व ०८ उपविभागनिहाय** सदर रस्ता सुरक्षा अभियान पार पडणार आहे.

अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतुक नियमांची कठोर अंमलबजावणी करणे हा या मोहिमेचा उद्‌देश न ठेवता समाजप्रबोधनातुन रस्ता सुरक्षेचे महत्व पटवुन द्यावे हा या मोहिमेचा उद्‌देश आहे. सदर सुरक्षा अभियानात पंधरा दिवस विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. शाळा व कॉलेजेसमधुन मुलांचे प्रबोधन करणे, वाहतुकीचे नियम व त्याचे महत्व विद्यार्थ्यांना समजावुन सांगणे, शाळांमधील परिवहन समित्यांची बैठक घेणे, स्कुल बसेसची तपासणी करून मार्गदर्शन करणे, तसेच चालकांचे प्रशिक्षण व आरोग्य शिबीर कार्यक्रम, अपघातग्रस्तांना प्रथमोपचार प्रशिक्षण, रस्ता सुरक्षा जनजागृतीकरीता चौकसभा, रॅली, पोस्टर्स/बॅनर्स/पत्रके प्रसारित करणे असे विविध उपक्रम सदर रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत राबविले जाणार आहेत.  सदर अभियानाचे दुस-या टप्प्यात वाहतुक नियमांची कठोर अंमलबजावणी केली जाणार आहे, यात हेल्मेट आणि सिटबेल्ट तपासणी करणे, अवैध प्रवासी वाहतुक रोखणे, मद्यपान करून गाडया चालवणा-या चालकांवर कारवाई करणे आणि जादा मालवाहतुक करणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे.

सदर रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत नाशिक ग्रामीण जिल्हा  वाहतुक नियंत्रण शाखेतर्फे सर्व वाहन चालकांना आवाहन करण्यात येते की, १) दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करावा, २) चारचाकी वाहन चालवितांना सीट बेल्टचा वापर करावा, ३) वेगमर्यादेपेक्षा अतिवेगाने वाहन चालवु नये, ४) मद्य प्राशन करून वाहन चालवु नये, ५) वाहन चालवितांना मोबाईल फोन वापरणे टाळावे, ६) रस्त्यांवर धोकादायकरित्या वाहन चालवु नये, ७) वाहन चालवितांना पादचा-यांना प्राधान्य द्यावे, ८) लेन कटींग करू नये, ९) वाहनांचे इन्शुरन्स करून घ्यावे तसेच नियमित पी.यु.सी.चेक करून घ्यावे. १०) रस्त्यावरून येणा-या जाणा-या वाहनांना त्रास होईल या पध्दतीने वाहने पार्कींग करू नये, ११) वाहन परवाना नसलेल्या मुलांना वाहन चालविण्यास देवु नये, १२) रस्ता सुरक्षेसाठी सुचना फलक, चिन्हे यांचेकडे लक्ष देवुन त्यांचे काटेकोरपणे पालन करावे., १३) वाहन चालवितांना पुढील वाहनापासुन सुरक्षित अंतर ठेवावे, १४) ओव्हरटेक करतांना वाहनाचे उजव्या बाजुनेच करा., १५) आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवु नये, १६) पालकांनी आपल्या मुलांना स्कुल बसेसमध्ये पाठवितांना योग्य ती खबरदारी घ्यावी तसेच वाहन चालकाची वैयक्तिक माहिती तसेच ड्रायव्हिंग लायसन्स, बिल्ला व वाहनाचे पेपर असल्याची खात्री करावी, १७) अपघातग्रस्त व्यक्तीचे प्राण वाचविणे व त्यास तात्काळ वैद्यकिय उपचार मिळवुन देणे हे प्रत्येक व्यक्तीचे प्रथम कर्तव्य आहे.

अपघात झााला की आपण सगळे हळहळ व्यक्त करतो, परंतु अपघात टाळायचा असेल तर वाहतुक सुरक्षेचा, रस्ता सुरक्षेचा विचार हा एक संस्कार म्हणुन तरूणांवर बिंबविणे जितके गरजेचे आहे, तितकेच भविष्यात आयुष्यभर त्याचे पालन करणेही आहे. अपघात झाल्यावर बोलण्यापेक्षा, अपघात होवु नये म्हणुन काळजी घेऊया, वाहतुक नियमांचे पालन करूया आणि दुर्दैवाने अपघात झालाच तर एका सुजान नागरीकाचे कर्तव्य बजावुन जखमींना रूग्णालयात उपचारासाठी दाखल करूया. वाहन चालकांसोबत नागरीक, विद्यार्थी यांच्यामध्ये रस्ते सुरक्षेबाबत जाणीव जागृती झाल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असुन अपघातांमुळे जिवीतहानी, वाहनांचे नुकसार, राष्ट्रीय संपत्तीची हानी टाळता येणार आहे. तसेच सदर अभियानात समाजातील सर्व घटकांनी सहभाग नोंदवुन वाहतुक नियमांचे पालन केल्यास अपघातांमुळे शासन यंत्रणांवर ताण व अपघातांचे प्रमाण कमी होण्यास निश्तिच मदत होईल. वाहतुकीचे नियम व कायद्याचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी रस्ते सुरक्षेला महत्व देवुन सडक सुरक्षा... जीवन रक्षा हा संकल्प आपण सर्व करू ॥ असे आवाहन जनतेस करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस मुख्यालय आडगाव येथे रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्‌घाटन करण्यात आले असुन उद्‌घाटन प्रसंगी अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. अशोक करपे, पोलीस निरीक्षक जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा श्री.संदिप कोळेकर, तसेच वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.